# प्रेसनोट

अल्पवयीन मुलांनी मोटार वाहन चालवितांना होणारे अपघात व त्यामुळे होणारी जिवीत वित्तहानी याला आळा बसावा,प्रतिबंध व्हावा याकरीता राज्यभरात पोलीसांकडुन दि.१०/१२/२०१८ ते २४/१२/२०१८ या कालावधीत (Prohibit Under Age Driving) हे अभियान राबविण्यात आले.

सदर अभियानाचाच एक भाग म्हणुन भंडारा जिल्हयात पोलीसांकडुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.यामध्ये जनजागृतीपर रॅलीज,पालक –पाल्य समुपदेशन, माहितीप्रत्रकांचे वाटप सर्व पोलीस ठाण्यांकडुन करण्यात आले.तसेच विविध शाळा कॉलेजेस व कोचींग क्लासेस मध्येही याबाबत पोलीसांनी माहीतीपत्रके वाटुन जनजागृती केली.

सदर अभियानादरम्यान जिल्हयात पोलीसांनी मोटार वाहने चालविणारे एकुण ४४ अल्पवयीन मुलांवर कारवाई कुन त्यांचेकडुन प्रत्येकी रूप्ये ५००/रूपये प्रमाणे रूप्ये २२०००/रू. व सदर मुलांचे पालकांकडुन प्रत्येकी १०००/रू.प्रमाणे एकुण रूपये ४४०००/–दंड असा एकुण ६६०००/– दंड वसुल केला.

जी अल्पवयीन मुले व त्यांचे पालक दंडाची रक्कम भरू शकले नाहीत.त्यांच्या केसेस कोर्टात पाठविण्यात येणार असुन,अशामुलांना प्रत्येकी रू.५००/– पर्यंत व पालकांना प्रत्येकी रूपये १०००/– पर्यंत दंड होउ शकातो.किंवा ०३(तीन) महिन्यापर्यंत साध्या तुरूंगवासाची कैद किंवा दोन्ही शिक्षा होवु शकतात.

यापुढेही सदर कारवाई निरंतरपणे सुरू राहणार असुन,पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांना मोटार वाहने चालविण्यास अनुमती देवु नये असे आवाहन पोलीस अधीक्षक विनीता साहु यांनी केले आहे.

(बी.आर.गाडे)
पोलीस निरीक्षक
वाहतुक नियंत्रण शाखा,भंडारा